माहिती हवीय?

श्रीधर गावडे, बेळगाव-कर्नाटक.

□ अदनान सामीने कोणकोणत्या चित्रपटात गाणी गायलीत?

— *अजनबी, आँखे, कयामत* यासारख्या काही चित्रपटात अदनान सामीने गाणी गायलीत.

संतोष हालकुडे, सोलापूर.

□ जॉनी वॉकरने कोणकोणत्या मराठी चित्रपटात भूमिका केल्या?

— जॉनी वॉकरने *श्रीमंत मेहुणा पाहिजे* या एकमेव मराठी चित्रपटात भूमिका केली होती.

राणी बनसोडे, कळवा.

□ कामिनी कौशल या अभिनेत्रीचा पहिला चित्रपट कोणता? नायक व दिग्दर्शक कोण? तिने कधी मराठी चित्रपटात भूमिका केलीय का?

— १९४६चा *नीचानगर* कामिनी कौशलचा पहिला चित्रपट. नायक रफीक अन्वर, दिग्दर्शक चेतन आनंद. तिने कधी मराठी चित्रपटात भूमिका केली नाही. मराठीतील इंदुमती पैंगणकर या अभिनेत्रीने हिंदीत गेल्यावर कामिनी कौशलच्या नावावरून कानन कौशल हे नाव घेतलं आणि नंतर याच नावाने मराठीत भूमिका केल्या.

विद्यानंद जोशी, कोल्हे.

□ आजवर कोणकोणत्या अमराठी संगीतकारांनी मराठी चित्रपटांना संगीत दिलंय?

— भूर्जी खाँसाहेब(*कुरुक्षेत्र*), प्राणसुख एम. नायक(*रुक्मिणी हरण, देवकी*), धम्मन खान(*छाया*), जी. पी. कपूर(*अकरावा अवतार*), शंकरराव व्यास (*भरत भेट, सुदाम्याचे पोहे* आणि *रामराज्य*), हेमंतकुमार (*नायकिणीचा सज्जा*), अविनाश व्यास (*बोलकी बाहुली*), सलिल चौधरी(*सूनबाई*), महंमद रफी(*श्रीमान बाळासाहेब, श्रीमंत मेहुणा पाहिजे*), आदिल अहमद(*स्वप्न तेच लोचनी*), सूरज(*ती मी नव्हेच*), सुरेशकुमार(*घरचा भेदी*), इकबाल गील(*तू सौभाग्यवती भव*), भप्पी लाहिरी(*डोक्याला ताप नाही*), लक्ष्मीकांत प्यारेलाल(*बाळा जो जो रे*), सूरदीप (*एप्रिल फूल*), आर. डी. बर्मन(*सुखी संसाराची बारा सूत्रे*), प्रकाश मोदी(*टोपी वर टोपी*), वनराज भाटिया (*बनगरवाडी, कथा दोन गणपतरावांची*), कुलदीप सिंग(*हसरी*), एस. बब्बन, नीला आकाश(*सौभाग्य*), सुखविंदर सिंग (*अस्तित्व*), अंजन विश्वास (*ध्यासपर्व*),आशिष शर्मा(*संघर्ष जीवनाचा*), ललित सेन-संजय कोहली(*देवकी*).

□ शत्रुघ्न सिन्हा यांनी अभिनय केलेला शेवटचा चित्रपट कोणता?

— दिग्दर्शक ओशो राज यांचा भारत भाग्यविधाता हा शत्रुघ्नने अभिनय केलेला अखेरचा चित्रपट. सध्या तो मधूर भंडारकरच्या *आन*मध्ये काम करतोय.

रमेश अहिरे, दत्तपाडा, बोरीवली.

□ गजानन जहागिरदारनी कोणकोणते मराठी चित्रपट दिग्दर्शित केले? नायक-नायिका कोण?



रामशास्त्रीमध्ये गजानन जागिरदार

— *उमाजी नाईक*(केशवराव दाते-कमलाबाई बडोदेकर), *पायाची दासी*(अविनाश-वनमाला), *वसंत सेना*(शाहू मोडक-वनमाला), *रामशास्त्री*(गजानन जागिरदार-रंजना), *वैजयंता* (सूर्यकांत-जयश्री गडकर), *सुखाची सावली* (काशिनाथ घाणेकर-जयश्री गडकर), *दोन्ही घरचा पाहुणा*(अनिल हवालदार-पुष्पा भोसले).

रविकांत साखरे, जामखेड.

□ सन १९७७ ते १९८७ या दशकात कोणकोणत्या चित्रपटांना, नायक-नायिकांना आणि दिग्दर्शकांना फिल्मफेअर पुरस्कार मिळाले?

— १९७७: चित्रपट *भूमिका*, नायक अमिताभ बच्चन(*अमर अकबर ॲन्थोनी*), नायिका शबाना आझमी(*स्वामी*), दिग्दर्शक बासू चटर्जी(*स्वामी*). १९७८: चित्रपट *मैं तुलसी तेरे आंगन की*, नायक अमिताभ बच्चन(डॉन), नायिका नूतन(*मैं तुलसी तेरे आंगन की*), दिग्दर्शक सत्यजित रे(*शतरंज के खिलाडी*). १९७९: चित्रपट *जुनून*, नायक अमोल पालेकर(*गोलमाल*), नायिका जया भादुरी(*नोकर*), दिग्दर्शक श्याम बेनेगल (*जुनून*). १९८०: चित्रपट *खुबसूरत*, नायक नसीरुद्दीन शाह(*आक्रोश*), नायिका रेखा (*खुबसूरत*), दिग्दर्शक गोविंद निहलानी (*आक्रोश*). १९८१: चित्रपट *कलियुग*, नायक नसीरुद्दीन शाह(*चक्र*), नायिका स्मिता पाटील(*चक्र*), दिग्दर्शक मुजफ्फर अली (*उमराव जान*). १९८२: चित्रपट *शक्ती*, नायक दिलीपकुमार(*शक्ती*), नायिका पद्मिनी कोल्हापूरे(*प्रेमरोग*), दिग्दर्शक राज कपूर (*प्रेमरोग*). १९८३: चित्रपट *अर्धसत्य*, नायक नसीरुद्दीन शाह(*मासूम*), नायिका शबाना आझमी(*अर्थ*), दिग्दर्शक गोविंद निहलानी (*अर्धसत्य*). १९८४: चित्रपट *स्पर्श*, नायक अनुपम खेर(*सारांश*), नायिका शबाना आझमी (*भावना*), दिग्दर्शक सई परांजपे(*स्पर्श*). १९८५ला फिल्मफेअर ॲवॉर्डस् दिले गेले नव्हते. १९८६: चित्रपट *राम तेरी गंगा मैली*, नायक कमल हासन (*सागर*), नायिका डिंपल कापडिया (*सागर*), दिग्दर्शक राज कपूर(*राम तेरी गंगा मैली*), १९८७ला फिल्मफेअर ॲवॉर्डस् दिले गेले नाहीत.

□ *प्ले बॉय, कालका, तिसरा किनारा, बीवी ओ बीवी, प्रेमी गंगाराम, प्रेम विवाह, बॉम्बे रेसकोर्स* या चित्रपटातील नायक-नायिका कोण? दिग्दर्शक कोण?

— आपण विचारलेल्या चित्रपटांपैकी *प्रेमी गंगाराम* या चित्रपटाचा मुहूर्त झाला होता. पण हा चित्रपट मुहूर्तापलिकडे गेला नाही. यामुळे या चित्रपटाची काहीच माहिती सांगता येणार नाही. अन्य चित्रपटांची माहिती पुढीलप्रमाणे. *प्ले बॉय*: नायक रुपेशकुमार, नायिका रितू कमल, दिग्दर्शक: टी. जानकीराम. *कालका*: नायक शत्रुघ्न सिन्हा, नायिका रामेश्वरी, दिग्दर्शक लोकेश लालवानी. *तिसरा किनारा*: नायक राज बब्बर, नायिका स्मिता पाटील, दिग्दर्शक कृष्णकांत. *बीवी ओ बीवी*: नायक संजीवकुमार, रणधीर कपूर, नायिका पूनम धिल्लाँ, योगीता बाली, दिग्दर्शक राहूल रवैल. *प्रेम विवाह*: नायक मिथुन चक्रवर्ती, नायिका बिंदिया गोस्वामी, दिग्दर्शक बासू चटर्जी. *बॉम्बे रेसकोर्स*: नायक अजीत, नायिका नलिनी जयवंत, दिग्दर्शक केदार कपूर.